MHDH050012092023

| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | ०६.०७.२०२३ |
| नोंदणी दिनांक | : | ०६.०७.२०२३ |
| निकाल दिनांक | : | २४.०३.२०२६ |
| कालावधी | : | ०२ व. ०८ म. १८. दि. |

<u>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, साक्री यांचे न्यायालय</u>
(पिठासीन अधिकारी मुग्धा एम. गांगुर्डे)

<u>फौजदारी किरकोळ अर्ज क्र.३९१/२०२३</u>
<u>निशाणी २५</u>

१. सणा रहिम पटेल उर्फ सणा मुश्ताक पटेल,
**वय :** २४ वर्षे, **व्यवसाय :** काहीनाही,
२. तैमुर रहिम पटेल,
**वय :** २ वर्ष ८ महिने, **व्यवसाय :** काहीनाही,
**दोन्ही रा.:** घेडयामाळ, पिंपळनेर, ता.साक्री, जि.धुळे. **..अर्जदार**

**विरुध्द**

१. रहिम कडु पटेल,
**वय :** २८ वर्षे, **व्यवसाय :** खाजगी नोकरी,
२. कडु रसुल पटेल,
**वय :** ५३ वर्षे, **व्यवसाय :** व्यापार,
३. साबेरा कडु पटेल,
**वय :** ४८ वर्षे, **व्यवसाय :** घरकाम,
४. गुफरान कडु पटेल,
**वय :** २६ वर्षे, **व्यवसाय :** नोकरी,
**सर्व रा.:** खेडी (कोरपावली),
ता.यावल, जि.जळगाव. **...सामनेवाला**

---

**कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम १२ अन्वये विविध मागण्यांसाठी अर्ज**

---

**अर्जदारांतर्फे : विधीज्ञ श्री. एम.बी.साळुंके.**
**सामनेवालांतर्फे : विधिज्ञ श्री. जी.के.पाटील.**

---

## न्या य नि र्ण य
## (पारित दिनांक २४ मार्च, २०२६)

. अर्जदाराने **कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम १२** अन्वये विविध मागण्यांसाठी प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे.

२. <u>अर्जदारांचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे</u>

अर्जदार क्र.१ व सामनेवाला क्र.१ यांचा विवाह दिनांक ०२.०१.२०२२ रोजी घोडयामाळ, पिंपळनेर, ता.साक्री, जि.धुळे येथे धर्मशास्त्राप्रमाणे झाला. सदर विवाह संबंधातुन त्यांना एक मुलगा अर्जदार क्र.२ नामे, तैमुर आहे. अर्जदार क्र.१ व सामनेवाला क्र.१ यांचे विवाह संबंध अद्याप पावेतो कायम आहेत. सामनेवाला क्र.२ व ३ हे अर्जदार क्र.१ चे सासरे व सासु असून सामनेवाला क्र.४ हे दिर आहेत.

३. अर्जदार क्र.१ चे पुढे कथन की, लग्नानंतर अर्जदार क्र.१ ही सामनेवाला क्र.१ यांच्याकडे लग्नानंतर तिला सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी सामनेवाला क्र.१ यास रेल्वे खात्यात नोकरीसाठी माहेरुन रक्कम रुपये ५,००,०००/–घेवुन ये अशी मागणी करित होते. सदरच्या मागणीमुळे अर्जदार क्र.१ ही खुपच घाबरली व ती आजारी पडली. त्यानंतर, सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी अर्जदार क्र.१ हिच्या आईवडीलांना फोन करुन अर्जदार क्र.१ हिस माहेरी घेवुन जाणेसाठी सांगीतले. त्यानंतर, अर्जदार क्र.१ चे आईवडील व काका असे सामनेवाला यांच्या घरी आले अर्जदार क्र.१ हिस माहेरी घेवुन आले.

४. अर्जदार क्र.१ चे पुढे कथन की, त्यानंतर, अर्जदार क्र.१ ही पाच दिवस दवाखान्यात ॲडमीट राहिली. त्यादरम्यान सामनेवाला यांनी अर्जदार क्र.१ हिच्या तब्येतीची चौकशीही केली नाही. शेवटी अर्जदार क्र.१ च्या आईवडीलांनी

सामनेवाला यांना फोन करुन अर्जदार क्र.१ हिची तब्येत उत्तम झालेली आहे तरी, अर्जदार क्र.१ हिस सासरी घेवुन जा. त्यानंतर, सामनेवाला क्र.२ व ३ तसेच, इतर नातेवाईक हे अर्जदार क्र.१ हिस घेण्यासाठी आले व सासरी घेवुन गेले. त्यानंतर सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी पुन्हा अर्जदार क्र.१ कडे रक्कम रुपये ५,००,०००/–ची मागणी केली. त्यावर अर्जदार क्र.१ हिने नकार दिला असता त्याचा राग येवुन सामनेवाला क्र.१ याने अर्जदार क्र.१ हिस जबरदस्त मारहाण करुन तिला शिवीगाळ केली. तसेच, सामनेवाला क्र.१ हा रोज अर्जदार क्र.१ हिस मारहाण करु लागला. तसेच, सामनेवाला क्र.३ हिने सांगीतले की, 'तुला झालेली मारहाण तुझे आईवडीलांना सांगू नको, सांगीतलेस तर तुला जीवंत सोडणार नाही' असे धमकावले.

**५.** अर्जदार क्र.१ चे पुढे कथन की, दरम्यानच्या काळात अर्जदार क्र.१ हिस सामनेवाला क्र.१ पासून दिवस गेल्याची बातमी अर्जदार क्र.१ हिने सामनेवाला क्र.१ ते ३ यांना सांगीतल्यावर सामनेवाला क्र.३ हिने अर्जदार क्र.१ हिस जास्त त्रास देण्यास सुरुवात केली व अर्जदार क्र.१ हिस अर्धपोटी ठेवुन वजनदार काम करण्यास भाग पाडत असे. तसेच, अर्जदार क्र.१ हिस गरोदरपणात कोणत्याही दवाखान्यात नेले नाही व औषधोपचार केला नाही. सामनेवाला क्र.३ ही अर्जदार क्र.१ च्या हातुन कुठल्याही प्रकारचे जेवण तसेच, पाणी देखील घेत नसे व अर्जदार क्र.१ हिस स्वयंपाक येत नाही, कोणत्याही प्रकारचे कामधंदा येत नाही, 'तुझे आई वडील नंगचोट आहे, माझे मुलाचे लग्न आमच्या परिस्थितीला शोभुन केले नाही' असे टोचून बोलत असे व घाण घाण शिवीगाळ करित असे.

**६.** अर्जदार क्र.१ हिचे पुढे कथन की, अर्जदार क्र.१ हिच्या भावासाठी मुलगी पाहण्याच्या कार्यक्रमासाठी अर्जदार क्र.१ हिच्या आईवडीलांनी सामनेवाला यांना फोन करुन सदर कार्यक्रमास येण्याचे सांगीतले असता सामनेवाला क्र.१ ते

३ यांनी सदर कार्यक्रमास जाण्यास त्यांनी नकार दिला. त्यानंतर, सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी संगनमत करुन सामनेवाला क्र.१ व अर्जदार क्र.१ हे सदर कार्यक्रमास गेले असता सदर कार्यक्रमात सामनेवाला क्र.१ याने अर्जदार क्र.१ हिच्या आईवडीलांशी भांडण केले व गलीच्छ भाषेत शिवीगाळ करुन अर्जदार क्र.१ हिस सदर कार्यक्रमात सोडून सामनेवाला क्र.१ हा निघून गेला.

**७.** अर्जदार क्र.१ हिचे पुढे कथन की, त्यानंतर, कार्यक्रम संपल्यानंतर अर्जदार क्र.१ हिने सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी अर्जदार क्र.१ हिस दिलेल्या त्रासाविषयी तिच्या आईवडीलांना सांगीतले. त्यानंतर, अर्जदार क्र.१ हिचे आईवडील अर्जदार क्र.१ हिस सासरी सोडण्यास गेले असता त्यांना सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी घरात न घेता जोरजोरात शिवीगाळ करुन त्यांना अपमानित करुन अर्जदार क्र.१ हिस ‘वागविणार नाही, तिला येथून घेवुन जा, नाहीतर आम्ही तिला मारुन टाकू’ अशी धमकी दिली. अर्जदार क्र.१ व तिच्या आईवडीलांनी सामनेवाला क्र.१ ते ३ यांच्या दिवसभर विणवण्या करुन देखील सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी अर्जदार क्र.१ हिस घरात घेतले नाही. शेवटी रात्री अर्जदार क्र.१ व तिचे आईवडीलांनी दिनांक २८.०३.२०२२ रोजी सामनेवाला क्र.१ ते ३ यांच्याविरुध्द पोलीस स्टेशनला तक्रार दिली व अर्जदार क्र.१ हिस घेवुन अर्जदार क्र.१ च्या मोठया बहिणीच्या घरी मौजे चोपडा येथे घेवुन आले.

८. अर्जदार क्र.१ हिचे पुढे कथन की, त्यानंतर, दिनांक ३०.०३.२०२२ रोजी सामनेवाला क्र.१ ते ३ यांना तसेच, त्यांचे प्रतिष्ठीत नातेवाईकांना फोन करुन चोपडा येथे बैठकीसाठी बोलावुन घेतले व बैठकीत अर्जदार क्र.१ हिस नांदविणेकामी घेवुन जावे असे सांगीतले असता सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी खोटे आरोप करुन अर्जदार क्र.१ हिच्या आईवडीलांकडून पैश्याची मागणी केली तरी देखील अर्जदार क्र.१ च्या आईवडीलांनी सामनेवाला

क्र.१ ते ३ यांना अर्जदार क्र.१ हिस नांदविणेस नेण्याची विनंती केली. परंतु, सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी त्यास नकार दिला व अर्जदार क्र.१ व तिच्या आईवडीलांशी भांडण करुन शिवीगाळ करुन निघून गेले.

**९.** अर्जदार क्र.१ हिचे पुढे कथन की, त्यानंतर, अर्जदार क्र.१ हिने सामनेवाला क्र.१ ते ३ यांच्या विरुध्द कौटुंबीक हिसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदयाअंतर्गत साक्री न्यायालयात फौजदारी किरकोळ अर्ज नं.१९७/२०२२ दाखल केला. त्यादरम्यान दिनांक २६.०७.२०२२ रोजी सामनेवाला व अर्जदार यांच्यात आपसात समझोता होवुन सामनेवाला क्र.१ याने अर्जदार क्र.१ हिस चांगल्या वागणुकीची लेखी हमी दिली व त्यामुळे, अर्जदार क्र.१ हिने सदरची केस काढून घेतली व सामनेवाला यांच्याकडे नांदण्यास गेली.

**१०.** अर्जदार क्र.१ चे पुढे कथन की, त्यानंतर देखील सामनेवाला क्र.२ व ३ हे अर्जदारास म्हणत असे की, 'तेरे मॉ बाप ने शादी मै दहेज नही दिया, कम से कम पाच लाख रुपये देणे चाहिए थे, मेहेंगे बर्तन, चीजे नही दी, फकीरो के साथ रिश्ता हो गया.' असे म्हणून अर्जदार क्र.१ कडे सतत रक्कम रुपये पाच लाखाची मागणी करित असे. सामनेवाला क्र.१ हा अर्जदार क्र.१ हिस म्हणत असे की, 'तु मुझे बिलकुल पसंद नही है, मै तुझे तलाक दे दुंगा, तु अगर मेरे घर से नही गयी तो मै तेरे सामने दुसरी औरत लेकर आउंगा, तुझे सिर्फ घर के काम करने के लिए रखुंगा' असे म्हणून सतत तलाक देण्याची धमकी देत असे.

**११.** अर्जदार क्र.१ चे पुढे कथन की, अर्जदार क्र.१ ही गरोदर असतांना सामनेवाला क्र.१ ते ३ हे अर्जदार क्र.१ हिस म्हणत असे की, 'हम तेरे उपर एक रुपया भी नही खर्च करेंगे, तेरा डिलीव्हरी का सारा खर्चा तेरे मॉ बाप को करने को बोल.' अर्जदार क्र.१ हिस ९ वा महिना चालू असतांना सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी तिला घराबाहेर काढून दिले. त्यानंतर, दिनांक ०८.१०.२०२२ रोजी

अर्जदार क्र.१ हिला मुलगा झाला. त्यानंतर, अर्जदार क्र.१ चा मुलगा तीन महिन्याचा असतांना अर्जदार क्र.१ स्वत: सामनेवाला क्र.१ यांच्याकडे नांदण्यास गेली. त्यानंतर, सामनेवाला क्र.३ ही अर्जदारास म्हणत असे की, 'मैने दो शादीया की थी, तो मेरा बेटा भी दोन औरते कर सकता है, वो भी दुसरी शादी कर लेंगा, तेरी कोई जरुरत नही है हमे, अब तु तेरे मॉ बाप से पाच लाख रुपये लेके आ, नही तो हम तुझे जिंदा जला देंगे और बोलेंगे की, तुने खुदखुशी कर ली, हम तेरे बच्चे को भी नही छोडेंगे' असे म्हणून गलीच्छ भाषेत शिवीगाळ करुन हाताबुक्कयांनी मारहाण करुन दिनांक १५.०४.२०२३ रोजी अर्जदार क्र.१ व २ यांना घराबाहेर काढून दिले.

**१२.** अर्जदार क्र.१ चे पुढे कथन की, सामनेवालांनी कोणतेही संयुक्तीक कारण नसतांना स्वतःहून अर्जदारांना मानसिक आणि शारिरीक छळ करुन त्यांचा त्याग केला आहे तसेच दरम्यानच्या काळात सामनेवालांनी अर्जदारांच्या पालनपोषणाची, औषधोपचाराची आणि उदरनिर्वाहाची कोणतीही व्यवस्था केलेली नाही. अर्जदार ही स्वतःचे व मुलाचे पालन पोषण करण्यास असमर्थ आहे. उलटपक्षी सामनेवाला यांची परिस्थिती चांगली आहे. सामनेवाला क्र.१ हा जळगाव येथे नामांकीत कंपनीत खाजगी नोकरी करित असून त्यापासून त्याला दरमहा रक्कम रुपये ३०,०००/– ते ४०,०००/–मिळतात. सामनेवाला यांच्याकडे दोन प्लॉट व स्वत:चे घर आहे. सामनेवाला क्र.१ हा अर्जदारांचे पालन पोषण करण्यास समर्थ आहे. म्हणून अर्जदाराने प्रस्तुत अर्ज दाखल केला.

**१३.** प्रस्तुत अर्ज दाखल झाल्यानंतर सामनेवाला क्र.१ ते ४ यांनी **निशाणी १५** अन्वये कैफियत दाखल करुन अर्जदारांसोबतचे नातेसंबंध कबुल करुन अर्जातील सर्व आरोप विवेक्षितपणे नाकारले. सामनेवाला यांचा बचाव की, अर्जदार क्र.१ हिस नेहमी माहेरच्या लोकांचा लळा असायचा. अर्जदार क्र.१ ही

गरम, रागीट व संतापी स्वभावाची असल्याने ती सामनेवाला यांना दाबून मारण्याचा प्रयत्न करित असे. लग्नानंतर अर्जदार क्र.१ म्हणत असे की, ‘मला तुमच्या गरीब घरामध्ये रिश्ता मंजुर नाही, माझे घरच्या लोकांनी माझे तुमच्याशी जबरदस्तीने लग्न लावले आहे आणि म्हणून माझे मनात जे येईल ते मी करेल, मला तुम्ही जास्त शहानपणा शिकवायचा नाही’ असे म्हणत असे. अर्जदार क्र.१ ही घरामध्ये कोणासाठी स्वयंपाक देखील करित नसे आणि सांगायची की मी काहीच करणार नाही, फक्त झोपेल आणि आराम करेल. अर्जदार क्र.१ ही फक्त पाच महिने सासरी थांबली होती.

**१४.** सामनेवाला क्र.१ यांचा पुढे बचाव की, अर्जदार क्र.१ ही नेहमी आत्महत्या करण्याची धमकी देत असे व तुम्हाला जेलमध्ये बसवेल अशी धमकी देत असे. अर्जदार क्र.१ ही घरात कोणालाही न सांगता माहेरी निघून जायची. सामनेवाला क्र.१ यास अर्जदार क्र.१ च्या वडीलांनी बोरनार येथे मारहाण केली होती. लग्नानंतर आजपावेतो अर्जदार क्र.१ हिने सामनेवाला क्र.१ यास संसार सुख दिले नाही. त्याबाबत सामनेवाला क्र.१ हा अर्जदार क्र.१ हिस समजाविण्यास गेला असता अर्जदार क्र.१ हिने सामनेवाला क्र.१ यास ‘भडवे तु मुझे पसंत नही है, क्यु की, तु अच्छे कपडे नही पहेनता, फॅशनसे नही रहता, मुझे फारकत देदे’ असे सांगत असे.

**१५.** सामनेवाला क्र.१ यांचा पुढे बचाव की, १४ एप्रिल रोजी अर्जदार क्र.१ ही सामनेवाला क्र.१ यास म्हणाली की, तु मला आवडत नाही, मी तुझेजवळ तुझेसोबत राहू शकत नाही असे म्हणून १५ एप्रिल रोजी अर्जदार क्र.१ ही सकाळी ०८.०० वाजेचे दरम्यान घरातुन कोणाला काहीएक न सांगता पळून गेली. त्यावेळी सामनेवाला क्र.१ याने अर्जदार क्र.१ च्या वडीलांना फोन केला असता तिचे वडील सामनेवाला क्र.१ यास म्हणाले की, मै तुझपे भारी पडुंगा असे म्हणून त्यानी

सामनेवाला क्र.१ यास मारण्यासाठी लोक देखील आणले होते. त्यानंतर, अर्जदार क्र.१ हिने सामनेवालांविरुध्द खोटया आशयाची केस दाखल केली होती. परंतु, त्यात समझोता करुन अर्जदार क्र.१ हिस पुन्हा नांदविण्यासाठी आणले तरी देखील अर्जदार क्र.१ ही घरात कोणाशी बोलत नव्हती, एकटी दरवाजा बंद करुन रुममध्ये राहत होती, जेवण बाहेर करायची. अर्जदार क्र.१ ही सामनेवाला क्र.१ यास नेहमी म्हणत असे की, जळगाव या भुसावळ येथे रहायला चल, नाहीतर माझे माहेरी रहायला चल, तिथे राहू, मला तुझे घर पसंत नाही, तुझे आईवडील मला पसंत नाही, मी माझे घरी ५,०००/–चा ड्रेस घालते, तु माझा शौक पूर्ण करु शकत नाही, माझे सगळे शौक राजेशाही होते आणि हेच मला येथे देखील हवे आहे. अर्जदार क्र.१ ही घरामध्ये कोणासही इज्जत देत नव्हती, कोणाला पाणी पीण्यासाठी देत नव्हती.

**१६.** सामनेवाला क्र.१ यांचा पुढे बचाव की, सामनेवालांनी अर्जदारांचा कधीही कोणताही कौटुंबिक छळ केलेला नसून अर्जदार स्वतःहून माहेरी राहत आहे. सामनेवाला हे अत्यंत गरीब परिस्थितीमध्ये राहतो व मजुरी करतो. सबब अर्ज नामंजुर करण्यात यावा, अशी सामनेवाल्यांनी विनंती केली.

**१७.** अभिलेखावर आलेला दोन्ही बाजुंचे कथने, बचाव आणि साक्ष लक्षात घेता उचित निर्णयापर्यंत पोहचण्याकरीता खालील मुद्दे विचारार्थ येतात, सदर मुद्दयांवर सुसंगत कारणमिमांसेसह निष्कर्ष नोंदविण्यात आले ते खालीप्रमाणे –

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | सामनेवाला क्र.१ ते ४ यांनी अर्जदारावर कौटुंबिक हिंसाचार केल्याची बाब अर्जदाराने सिध्द केली काय ? | **...होय** |

| | | |
|---|---|---|
| २. | सामनेवाला क्र.१ याने कोणतेही संयुक्तीक कारणांशिवाय अर्जदारांचा सांभाळ करण्यास नकार दिल्याची बाब अर्जदाराने सिध्द केली काय ? | **...होय** |
| ३. | अर्जदार संरक्षणात्मक आदेश मिळण्यास पात्र आहेत काय ? | **...होय** |
| ४. | अर्जदार हे सामनेवाला क्र.१ कडून अन्न, वस्त्र आणि औषधोपचारासाठी खावटी मिळण्यास पात्र आहेत काय ? असल्यास किती ? | **अंशतः होय अर्जदार क्र.१ व २ यांना दरमहा रुपये २,५००/– प्रत्येकी.** |
| ५. | सामनेवालांकडून, शारिरीक, मानसिक आणि कौटुंबिक छळ झाला म्हणून नुकसान भरपाई मिळण्यास अर्जदार पात्र आहे काय ? असल्यास किती ? | **अंशतः होय रक्कम रुपये १५,०००/–** |
| ६. | अर्जदार ही सामनेवाला क्र.१ कडून सामनेवाला यांच्या घराच्या दोन खोल्या अर्जदारांना राहण्याकरिता अर्जदाराच्या ताब्यात दयाव्या अथवा अर्जदारांना भाडयाच्यापोटी दरमहा घरभाडेपोटी रक्कम रुपये ३,०००/– मिळण्यास अर्जदार पात्र आहे काय ? | **अंशतः होय दरमहा रुपये २,०००/–** |
| ७. | सामनेवाला यांच्या ताब्यातील सर्व स्त्रीधन ताब्यात मिळावे किंवा सदर दागदागीण्यांचे आजचा बाजार भावाप्रमाणे मुल्य ठरविण्यात येवुन येणारी रक्कम सामनेवाला यांच्याकडून मिळण्यास अर्जदार पात्र आहे काय ? | **नकारार्थी** |
| ८. | सामनेवाला यांनी त्यांच्या नावे व कब्जेउपभोगातील असलेल्या मिळकतींची कोणत्याही प्रकारे विक्री, गहाण, तारण बक्षिस कोणत्याही प्रकारे हस्तांतरण करु नये असा आदेश मिळण्यास अर्जदार पात्र आहे काय ? | **नकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| ९. | सामनेवाला क्र.१ यांच्या नावे व मालकी कब्जेउपभोगातील घर व जागा या वडीलोपार्जीत तथा एकत्र असल्याकारणारने त्यात अर्जदाराचा हक्क व हिस्सा असल्याने त्यातील अर्जदारांचा कायदेशिर हिस्सा तुटक करुन अर्जदाराच्या ताब्यात देण्याचा आदेश मिळण्यास अर्जदार पात्र आहे काय ? | **नकारार्थी** |
| १०. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## पुरावा

१८. अर्जदाराने अर्जातील कथने व सामनेवालांविरुध्दचे आरोप शाबीत करण्यासाठी स्वतःला **निशाणी १७** अन्वये तपासले असून **निशाणी ११** अन्वये त्याचे मालमत्ता व दायित्वाचे प्रमाणपत्र अभिलेखावर दाखल केलेले आहे. तसेच, अर्जदाराने दस्त पुरावा म्हणून **निशाणी २०** अन्वये दवाखान्याचे बिल, **निशाणी २१–ए ते आय** अन्वये मेडीकलची बिले दाखल केलेली आहेत. सामनेवाल्यांना पुरेशी संधी देवुन देखील सामनेवाल्याने अर्जदाराचा उलट तपास घेतला नाही म्हणून सामनेवाला विरुध्द उलट तपास नाही असा आदेश पारित झाला. तसेच, अर्जदार क्र.१ हिने **निशाणी २४** अन्वये तिचा पुरावा बंद केला आहे. तसेच, अर्जदाराचे कथन व आरोप खोडून काढण्यासाठी देखील सामनेवाल्यांना पुरेशी संधी दिली होती. मात्र, सामनेवाल्यांनी कोणताही सबळ असा दस्त अथवा साक्ष पुरावा अभिलेखावर दाखल केला नसल्याने सामनेवाल्यांचा पुरावा बंद करण्यात आला. अर्जदारातर्फे विधिज्ञ श्री.ए.एन.शेख यांचा युक्तीवाद ऐकला. युक्तीवादादरम्यान सामनेवाला व त्यांचे विधिज्ञ गैरहजर होते.

१९. अर्जदारातर्फे अभिलेखावर आलेल्या साक्ष पुराव्याच्या अवलोकनार्थ असे दिसून येते की, अर्जदाराने तीच्या सरतपासाच्या शपथपत्रामध्ये अर्जातील

कथनाचा पुनरुच्चार केल्याचे दिसून येते. अर्जदाराचा सामनेवालातर्फे उलट तपास घेण्यात आला नाही म्हणून अर्जदाराचा अभिलेखावर आलेला **निशाणी १७** अन्वयेचा साक्ष पुरावा आव्हानरहीत व अबाधित राहिला.

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ व २ करीता–**

**२०.** अर्जदारांचे कथन की, सामनेवाला क्र.१ ते ४ यांनी अर्जदाराचा वेळोवेळी शारिरीक व मानसिक छळ करुन तीचा कौटुंबिक हिंसाचार केल्याचे व सामनेवाला क्र.१ याने कोणतेही संयुक्तीक कारणांशिवाय अर्जदारांचा सांभाळ करण्यास नकार दिल्याचे सांगितले. मात्र सामनेवालांतर्फे अर्जदाराचे सदरचे कथन खोटे असल्याचा बचाव घेण्यात आला. अर्जदाराने केलेले कथन व आरोप सिध्द करणेकामी स्वत:स **निशाणी १७** अन्वये तपासले. मात्र, तिचे आरोप, कथन व साक्ष पुरावा खोडून काढणेकामी सामनेवाल्यांनी अर्जदाराचा उलट तपास न घेतल्यामुळे अर्जदाराचा उपरोक्त साक्ष पुरावा आव्हारहीत व अबाधित राहिला. तसेच, सामनेवाल्यांनी त्याच्या बचावाच्या पृष्ठयर्थ काहीएक दस्त अथवा साक्ष पुरावा दाखल केला नाही. परिणामी, अर्जदारांच्या कथनास व साक्ष पुराव्यास अधिक महत्व प्राप्त होते.

**२१.** अभिलेखावर आलेला अर्जदार क्र.१ चा उपरोक्त साक्षपुरावा लक्षात घेता असे दिसून येते की, अर्जदारांवर सामनेवाल्यांकडून वेळोवेळी झालेल्या कौटुंबीक हिंसाचाराच्या घटना अर्जदार क्र.१ ने सविस्तरपणे तिच्या साक्ष पुराव्यादरम्यान सांगीतले व तिचा साक्ष पुरावा खोडून काढण्यासाठी सामनेवाले अपयशी ठरले. उलटपक्षी, अर्जदार क्र.१ चा उपरोक्त साक्ष पुरावा खोडून काढण्यासाठी सामनेवाले यांनी ठोस असा साक्ष व दस्त पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही.

**२२.** उपरोक्त चर्चेच्या विवेंचनावरुन अर्जदारातर्फे अभिलेखावर आलेला एकंदरीत साक्ष पुरावा व सामनेवाल्यांचे साक्षपुराव्याचे मौन न्यायिक तराजुत तोलल्यास व मोजल्यास अर्जदाराने दिलेला साक्ष पुराव्यास अधिक महत्व प्राप्त होते. परिणामी, अर्जदाराने सामनेवाल्यांवर केलेले कथन व आरोप अर्जदाराने सबळ साक्ष पुराव्यानिशी अभिलेखावर आणलेले असून ते सिध्द केलेले आहे. करिता, सामनेवालांनी अर्जदाराचा शारिरीक व मानसिक छळ करुन तीचा कौटुंबिक हिंसाचार केला आहे व कोणतेही संयुक्तीक कारण नसतांना सामनेवाला क्र.१ याने अर्जदारांचा सांभाळ करण्यास नकार दिला असा दाखविणारा सबळ पुरावा अभिलेखावर असल्यामुळे **<u>मुद्दा क्र.१ व २ चा निष्कर्ष होकारार्थी</u>** नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ३ करीता–</u>**

**२३.** अर्जदाराच्या साक्ष पुराव्यावरुन असे दिसून येते की, सामनेवालांनी अर्जदारांचा वेळोवेळी कौटुंबिक हिंसाचार करुन शारिरीक आणि मानसिक छळ केल्याची बाब अर्जदाराने तीच्या साक्ष पुराव्यात सिध्द केलेली आहे. तसेच सदरच्या घटना पुन्हा होणे नाकारता येत नाही. त्यामुळे सदर कौटुंबिक हिंसाचाराची पुनरावृत्ती टाळण्यासाठी अर्जदाराच्या हक्कांमध्ये व तीच्या संरक्षाणाकरीता आदेश पारित करणे न्यायिकदृष्ट्या योग्य व उचित वाटते. म्हणून **<u>मुद्दा क्र.३ चा निष्कर्ष होकारार्थी</u>** नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ४ करीता–</u>**

**२४.** अर्जदाराचे पुढे कथन की, सामनेवाला क्र.१ हा जळगाव येथे कंपनीत खाजगी नोकरीत असून त्यापासून त्याला दरमहा रक्कम रुपये ३०,०००/– ते ४०,०००/–मिळतात. उपरोक्त कथनाच्या पृष्ठयर्थ अर्जदाराने कोणताही सबळ असा दस्त पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. तसेच,

सामनेवाला क्र.१ हा मजुरी करतो ही बाब त्याने त्याच्या खुलाशामध्ये मान्य व कबुल केली असल्याने सामनेवाला क्र.१ हा धडधाकट असून मोलमजुरी करुन काहीतरी कमावित असेल असे म्हणणे वावगे ठरणार नाही. त्यामुळे, सामनेवाला क्र.१ यास उत्पन्नाचे साधन असल्याचे दिसून येते.

**२५.** या ठिकाणी असे नमुद करावेसे वाटते की, अर्जदारांचा पत्नी व मुलगा म्हणून सांभाळण्याची नैतिक, कायदेशीर आणि सामाजिक जबाबदारी ही सामनेवाला क्र.१ वर पती व पिता म्हणून असून त्याने ती पार पाडलेली नसल्याचे अभिलेखावरुन दिसून येते. त्यामुळे अर्जदार क्र.१ व २ हे सामनेवाला क्र.१ याच्याकडून खावटी मिळण्यास पात्र आहे.

**२६.** उपलब्ध साक्ष पुरावा आणि अर्जदाराच्या गरजांचा आणि सद्यःपरिस्थितीत जिवनावश्यक वस्तूंच्या किंमती पाहता व त्याचे उत्पन्न पाहता, अर्जदार क्र.१ व २ हे सामनेवाला क्र.१ याच्याकडून खावटीपोटी दरमहा रक्कम रुपये २,५००/– प्रत्येकी (अक्षरी रुपये दोन हजार पाचशे मात्र) खावटी देण्याचा आदेश पारित करणे न्यायिक, उचित व क्रमप्राप्त होईल. म्हणून **मुद्दा क्र.४ चा निष्कर्ष अंशतः होकरार्थी नोंदवित** आहे.

**मुद्दा क्रमांक ५ करीता–**

**२७.** अर्जदाराने तीला झालेल्या शारिरीक, मानसिक व कौटुंबिक छळापोटी रक्कम रुपये पाच लाख नुकसान भरपाई मिळावी अशी विनंती केलेली आहे. अर्जदाराने तीच्या पुराव्याच्या शपथपत्रामध्ये सर्व सामनेवालांनी तीचा वेळोवेळी शारिरीक व मानसिक छळ करुन तीला शिवीगाळ व मारहाण केल्याचे अभिलेखावरुन दिसून येते. मुद्दा क्र.१ बाबत विवेचन करतांना सामनेवालांनी अर्जदाराचा वेळोवेळी कौटुंबिक हिंसाचार केल्याचे अभिलेखावर आलेले आहे. सदर कौटुंबिक हिंसाचाराच्या घटना विचारात घेता साहजिकच अर्जदाराला

शारिरीक, मानसिक, भावनिक आणि कौटुंबिक त्रासाला सामोरे जावे लागले असल्याची बाब नाकारता येत नाही. त्यामुळे अर्जदार ही नुकसान भरपाई मिळण्यास पात्र ठरते. सदर नुकसान भरपाई देत असतांना सामनेवाला क्र.१ याच्या उत्पन्नाबाबत अभिलेखावर अर्जदाराच्या तोंडी पुराव्याव्यतिरिक्त ठोस असा दस्त पुरावा आलेला नाही. सामनेवाला क्र.१ याने, अर्जदारास रक्कम रुपये १५,०००/– (अक्षरी रुपये पंधरा हजार मात्र) नुकसान भरपाई देणे न्यायिकदृष्ट्या योग्य व उचित वाटते. उपरोक्त चर्चेच्या आधारावर **मुद्दा क्र.५ चा निष्कर्ष अंशतः होकारार्थी नोंदवित** आहे.

**मुद्दा क्र.६ करीता–**

**२८.** अर्जदाराने निवा–यासाठी सामनेवाला यांच्या घराच्या दोन खोल्या अर्जदारांना राहण्याकरिता अर्जदाराच्या ताब्यात दयाव्या अथवा अर्जदारांना भाडयाच्यापोटी दरमहा घरभाडेपोटी रक्कम रुपये ३,०००/– मिळण्याची विनंती केलेली आहे. अर्जदार क्र.१ व २ सध्या सामनेवाला क्र.१ पासून विभक्त राहत असल्याचे अभिलेखावरुन दिसून येते. सदरची बाब अर्जदार हिच्या साक्ष पुराव्यावरुन अभिलेखावर आलेली आहे. त्यामुळे अर्जदारांच्या राहण्याची गैरसोय होत आहे, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. तसेच, सामनेवाले व अर्जदार क्र.१ यांच्यामध्ये कौटुंबीक मतभेद व वैवाहीक वाद झाल्याचे अभिलेखावरुन दिसून येत आहे. त्यामुळे, सामनेवाले यांच्या राहत्या घरी अर्जदारांना राहणेसाठी आदेश केला तर पुन्हा कौटुंबीक मतभेद, वैवाहीक वाद होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे, अर्जदारांना सामनेवाला क्र.१ पासुन दरमहा रक्कम रुपये २,०००/– (अक्षरी रुपये दोन हजार मात्र) घरभाडे देण्याचा आदेश न्यायोचित ठरेल. वरील सर्व विवेचनावरुन मी **मुद्दा क्रमांक ६ चा निष्कर्ष अंशतः होकारार्थी नोंदवित** आहे.

**<u>मुद्दा क्र.७ करीता–</u>**

२९. अर्जदाराने सामनेवाला यांच्या ताब्यातील सर्व स्त्रीधन ताब्यात मिळावे किंवा सदर दागदागीण्यांचे आजचा बाजार भावाप्रमाणे मुल्य ठरविण्यात येवुन येणारी रक्कम सामनेवाला यांच्याकडून मिळण्याची अर्जदाराने विनंती केली आहे. मात्र, अभिलेखाचे अवलोकनार्थ असे दिसून येते की, उपरोक्त नमुद केलेले स्त्रीधन अथवा दागदागीने यांचा तपशिल व त्यासंबंधी असलेले दस्त पुरावे अर्जदाराने अभिलेखावर आणलेले नसल्याने अर्जदार सदरची विनंती मागण्यास अपात्र आहे. त्यामुळे, अर्जदाराची सदरची विनंती नामंजुर करण्यात येवुन **मुद्दा क्र.७ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.**

**<u>मुद्दा क्र.८ व ९ करीता–</u>**

३०. अर्जदाराने सामनेवाला यांनी त्यांच्या नावे व कब्जेउपभोगातील असलेल्या मिळकतींची कोणत्याही प्रकारे विक्री, गहाण, तारण बक्षिस कोणत्याही प्रकारे हस्तांतरण करु नये तसेच, सामनेवाला क्र.१ यांच्या नावे व मालकी कब्जेउपभोगातील घर व जागा या वडीलोपार्जीत तथा एकत्र असल्याकारणाने त्यात अर्जदाराचा हक्क व हिस्सा असल्याने त्यातील अर्जदारांचा कायदेशिर हिस्सा तुटक करुन अर्जदाराच्या ताब्यात देण्याची विनंती केली आहे. मात्र, अभिलेखाचे अवलोकनार्थ असे दिसून येते की, उपरोक्त नमुद केलेल्या मिळकतींचा तपशिल व त्यासंबंधी असलेले दस्त पुरावे अर्जदाराने अभिलेखावर आणलेले नसल्याने अर्जदार सदरची विनंती मागण्यास अपात्र आहे. त्यामुळे, अर्जदाराची सदरची विनंती नामंजुर करण्यात येवुन **मुद्दा क्र.८ व ९ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.**

## <u>मुद्दा क्र.१० करीता–</u>

३१. एकंदरीत अभिलेखावर अर्जदाराचा आलेला साक्ष पुरावा आणि दस्त पुरावा, न्यायिक तराजूत तोलल्यास व मोजल्यास अर्जदाराच्या साक्ष पुराव्यास अधिक महत्व प्राप्त होते. तसेच उपरोक्त केलेल्या चर्चेच्या आधारावर परिणामी **मुद्दा क्र.१०** च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

**१.** अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

**२.** सामनेवाला क्र.१ यास आदेश देण्यात येतो की, त्याने अर्जदार क्र.१ व २ यांना अर्ज दाखल तारखेपासून दरमहा रक्कम रुपये २,५००/–प्रत्येकी (अक्षरी रुपये दोन हजार पाचशे मात्र) उदरनिर्वाह आणि औषधोपचारासाठी पोटगी द्यावी.

**३.** सामनेवाला क्र.१ यास आदेशित करण्यात येते की, शारिरीक, मानसिक आणि कौटुंबिक छळापोटी नुकसान भरपाई म्हणून अर्जदारास रक्कम रुपये १५,०००/– (अक्षरी रुपये पंधरा हजार मात्र) प्रस्तुत आदेश पारित झाल्यापासून साठ (६०) दिवसांच्या आत द्यावे.

**४.** सामनेवाला क्र.१ याने प्रस्तुत आदेश पारित झाल्यापासून दरमहा रक्कम रुपये २,०००/– (अक्षरी रुपये दोन हजार मात्र) अर्जदारास घरभाडेपोटी द्यावे.

**५.** सामनेवाला क्र.१ याने अर्जदाराला प्रस्तुत अर्जाचा खर्च म्हणून रक्कम रुपये २,०००/– (अक्षरी रुपये दोन हजार मात्र) स्वतंत्र द्यावे.

**६.** अर्जदाराचे दागीने व स्त्रीधन किंवा त्यापोटी बाजार भावाप्रमाणे रक्ककम सामनेवालांकडून मिळण्याची मागणी नामंजुर करण्यात येत आहे.

**७.** अर्जदाराने सामनेवाला यांनी त्यांच्या नावे व कब्जेउपभोगातील असलेल्या मिळकतींची कोणत्याही प्रकारे विक्री, गहाण, तारण बक्षिस कोणत्याही प्रकारे हस्तांतरण करु नये तसेच, सामनेवाला क्र.१ यांच्या नावे व मालकी कब्जेउपभोगातील घर व जागा या वडीलोपार्जीत तथा एकत्र

असल्याकारणाने त्यात अर्जदाराचा हक्क व हिस्सा असल्याने त्यातील अर्जदारांचा कायदेशिर हिस्सा तुटक करुन अर्जदाराच्या ताब्यात देण्याची विनंती नामंजुर करण्यात येत आहे.

**७.** सामनेवाला क्र.१ ते ४ यांना आदेश देण्यात येतो की, त्यांनी स्वतः अगर ति–हाईत इसमांतर्फे अर्जदारांचा कौटुंबिक हिंसाचार करु नये व त्याकरीता सामनेवाला क्र.१ ते ७ यांनी प्रत्येकी रक्कम रुपये ५,०००/–(अक्षरी रुपये पाच हजार मात्र) चे बंधपत्र द्यावे.

८. प्रस्तुत आदेशाच्या प्रती संरक्षण अधिकारी आणि संबंधीत पोलीस स्टेशन, यांना माहितीस्तव व कार्यवाहीकरीता पाठविण्यात याव्यात.

९. प्रस्तुत न्यायनिर्णयाची प्रत अर्जदार आणि सामनेवाला क्र.१ यांना विनामुल्य देण्यात यावी.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात येत आहे.)**

MUGDHA MUKUND GANGURDE
Digitally signed by MUGDHA MUKUND GANGURDE
Date: 2026.03.25 17:06:30 +0530

साक्री. **(मुग्धा एम. गांगुर्डे)**
दिनांक : २४.०३.२०२६. **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, साक्री.**